प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी,
~~मा. निवडणूक~~ अधिकारी सो., ~~सार्वजनिक बांधकाम~~
मिरा-भाईंदर ~~विभाग~~

१) अर्जदाराचे नाव :- श्री. ओमप्रकाश श्रीलाल पाल
मो. नं. ९७०२८४६९७६

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प.
आवक क्र. ५८१२४/२
दिनांक:- १६/ ९ /2022

२) पत्ता :- काशिमिरा, जनता नगर, दत्त मंदिर रोड, हरीओम चाळ समोर, सरोगी बिल्डींगच्या बाजूला, पो.मिरा, मिरारोड-पुर्व, ता.जि.ठाणे-४०१ १०७

३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल:-

(एक) माहितीचा विषय :- महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांनी त्याच्या महापौर कालावधीत केलेल्या कामाच्या माहितीची संपुर्ण संचिका मिळणेंबाबत...

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी :- महापौर झाल्यापासुन ते आजता गायत

(तीन) आवश्यक असलेला माहितीचे वर्णन :- मिरा-भाईंदर महानगर पालिकेच्या महापौर श्रीमती. ज्योत्स्ना हसनाळे यांनी त्याच्या महापौर कालावधी मध्ये केलेल्या कामांची संपुर्ण माहिती, सदर कालावधीत झालेल्या महासभेमध्ये महापौरांनी मंजुर केलेले ठराव, विषय, तसेच सदर कालावधीत महापौर निधीचा केलेला वापर, तसेच महापौर कालावधीत महापौरला देण्यांत आलेल्या सुविधांचा लाभ घेतला आहे किंवा नाही याबाबतची संपुर्ण सविस्तर संपुर्ण माहितीची संचिका सत्यप्रतीत आपली जी काही शासकीय फी असेल ती घेवुन देण्यांत यावी.

६६८ (न.स.)
१६/०९/२०२२

नगरसचिव

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः आवश्यक आहे किंवा कसे :- व्यक्तीशः.

(पाच) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :- न्यायालयीन कामकाजाकरीता

(सहा) अर्जदार दारीद्रय रेषेखालील आहे किंवा नाही :- नाही

ठिकाण :- भाईंदर (प.) ४०१ १०१
दिनांक :- १४/०९/२०२२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./५८ /2022 दिनांक :-१० /१० /2022

प्रति,
श्री. ओमप्रकाश पाल,
काशिमिरा, जनता नगर, दत्त मंदिर रोड,
हरीओम चाळ समोर, सरोगी बिल्डींगच्या बाजूला,
पो. मिरा, ता.जि.ठाणे 401107.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांनी त्यांच्या महापौर कालावधीत केलेल्या कामाच्या माहितीची संपूर्ण संचिका मिळणेबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 14/09/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांनी त्यांच्या महापौर कालावधीत केलेल्या कामाच्या माहितीची संपूर्ण संचिका तसेच महापौर कालावधीत महासभेमध्ये मंजुर केलेल्या ठरावांच्या प्रतींची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संदर्भित पत्रात नमुद महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांचे महापौर पदाच्या कालावधींत पारित झालेले ठराव ही बाब नगरसचिव विभागाशी निगडीत असून, केलेल्या कामांची संपुर्ण माहिती हा विषय सार्वजिनिक बांधकाम विभागाशी निगडीत आहे. करिता या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./57/2022, दि. 19/09/2022 अन्वये आपणांस उक्त माहिती परस्पर उपलब्ध करुन देणेकामी संदर्भित पत्राची छायांकित प्रत जनमाहिती अधिकारी, सार्व. बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचकडे वर्ग करण्यात आली आहे. तरी कृपया आपण सदर माहिती परस्पर घ्यावी.

महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांचे महापौर पदाच्या कालावधीत पारित झालेले मा. महासभेचे ठराव www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर नागरिकांच्या माहितीसाठी सार्वजनिकरित्या प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. आपण मागणी केलेली माहिती नागरिकांच्या माहितीसाठी सार्वजनिकरित्या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असल्याने, आपणांस अपेक्षीत माहिती संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावी ही विनंती.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल करता येईल.

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका



pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Omprakash Pal.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./४५ /2022

दिनांक :- १८ / ८ /2022

प्रति,
मा. जनमाहिती अधिकारी,
सार्व. बांधकाम विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- <u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>
नगरसेवक सदस्य असलेल्या महानगरपालिकेच्या विविध समित्यांबाबत.

संदर्भ :- श्री. ओमप्रकाश पाल यांचेकडील दि. 14/09/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये श्री. ओमप्रकाश पाल यांनी महापौर श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांनी त्यांच्या महापौर कालावधीत केलेल्या कामाच्या माहितीची संपूर्ण संचिका तसेच महापौर कालावधीत महासभेमध्ये मंजुर केलेल्या ठरावांच्या प्रतींची मागणी केलेली आहे.

संदर्भित पत्रातील श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे यांनी त्यांच्या महापौर कालावधीत केलेल्या कामाबाबतची माहिती हा मुद्दा सार्व. बांधकाम विभागाशी निगडीत असल्याने, संदर्भित अर्जाची छायांकित प्रत आपणांकडे वर्ग करण्यात येत आहे. तरी कृपया अर्जदारांस अपेक्षीत माहिती परस्पर द्यावी ही विनंती.

पोच
लिपीक
सार्वजनिक बांधकाम विभाग
मिरा-भाईंदर महानगर पालिका

(कैलास के. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-
श्री. ओमप्रकाश पाल,
काशिमिरा, जनता नगर, दत्त मंदिर रोड,
हरीओम चाळ समोर, सरोगी बिल्डींगच्या बाजूला,
पो. मिरा, ता.जि.ठाणे 401107.



pc 2U\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Omprakash Pal.docx